दैनिक महावृत्त

E-Mail:dainikmhavratt@gmail.com

संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990








लातूर वर्ष ५ वे अंक ४१ बुधवार दि.१३ ऑगस्ट २०२५ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.


# राज्यात एकाच महिलेचे ६ वेळा मतदार यादीत नाव

मुंबई : मागील आठवड्यात काँग्रेस नेते आणि लोकसभेचे विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी मतदार यादीतील घोळ पुराव्यासह समोर आणला. राहुल गांधी यांनी पत्रकार परिषदेत बंगळुरूतील एका मतदारसंघाचे उदाहरण देत मतदार यादीवर प्रश्नचिन्ह उभे केले. त्यानंतर सत्ताधारी पक्षाने राहुल गांधी यांच्यावर आरोप केले. आता महाराष्ट्रातील असाच एक प्रकार समोर आला आहे, ज्यात एकाच चेह-याची, एका नावाची महिला मतदार यादीत ६ वेळा तिचा उल्लेख करण्यात आला आहे. त्यात तिच्या नावाने वेगवेगळे एढकउ क्रमांक असल्याचे दिसून येते.

सुषमा गुप्ता असे या महिलेचे नाव आहे. पालघरमधील मतदार यादीत सुषमा यांचे नाव ६ वेळा मतदार यादीत आहे परंतु त्यात प्रत्येकाचा ईपीआयसी नंबर वेगळा आहे. सोशल मीडियावर याचा फोटो बराच व्हायरल होत आहे. त्यात निवडणूक आयोगाच्या वेबसाईटवर जात हा प्रकार सत्य आहे का हे जाणून घेण्याचा प्रयत्न केला. त्यावेळी या महिलेचे नाव, तिच्या पतीचे नाव टाकल्यानंतर तिच्या नावाने वेगवेगळे एढकउ असलेले मतदानमतदान कार्ड समोर आले आहेत. त्यात पालघर जिल्ह्यातील मतदारसंघात तिच्या नावाचा उल्लेख आहे.

मतचोरीच्या मुद्यावरून सध्या देशातील राजकारण तापले आहे. लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी मतदार यादीतील अनियमिततेबाबत गंभीर आरोप केले आहेत. मतचोरी ही एक व्यक्ती, एक मत या मूलभूत लोकशाही सिद्धांतावर हल्ला आहे. स्वतंत्र व




निष्पक्ष निवडणुकांसाठी स्वच्छ-पारदर्शक मतदार यादी गरजेची आहे. पारदर्शकता दाखवावी व डिजिटल मतदार यादी सार्वजनिक करावी. त्यामुळे जनता व राजकीय पक्षांना त्याचे स्वत:चे आडिट करता येईल अशी मागणी राहुल गांधी यांनी निवडणूक आयोगाला केली आहे.

# संत सेवालाल महाराज बंजारा/ लभाणा तांडा समृद्धी योजना मराठवाडा विभाग प्रमुख म्हणून अँड. पंडित भाऊ राठोड यांची निवड.

मुंबई :- देशातील बारा कोटी बंजारा समाजाचे कार्यक्षम नेतृत्व राष्ट्रीय बंजारा परिषद चे राष्ट्रीय महासचिव ड. पंडित भाऊ राठोड हे समाजाच्या प्रश्नावर गेली अनेक वर्ष सातत्याने कार्यरत आहेत, देशातील समाज हा विकासापासून कोसो दूर असताना त्यांनी धर्म नेता किसनभाऊ राठोड यांचे सोबत स्वखर्चातून अनेक धाम उभे केले, धर्मसत्ता, समाज सत्ता मजबुतीकरण, मंदिरांची स्थापना, बंजारा संस्कृती जतन, मुलांना शिक्षण, नोकरी मिळावी यासाठी प्रयत्न केले, अनेकाना रोजगार उपलब्ध करून दिला असून प्रसिद्ध उद्योजक म्हणून ही त्यांची ओळख आहे. त्यांनी समाजाला अर्थकारण, उद्योग, शिक्षण आणि तांडा,वस्ती, वाडीची सुधारणा व्हावी यासाठी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस साहेब यांच्या नेतृत्वाखाली भारतीय जनता पक्षात हजारो कार्यकर्ते सह प्रवेश केला होता. गेल्या विधानसभा , लोकसभा निवडणुकीत त्यांनी महाराष्ट्रातील जिल्हा, तालुका, तांडा- वस्ती येथे सातत्याने संपर्क प्रवास करून पिंजून काढत प्रचार प्रसार केला होता, त्यांचा हा प्रामाणिकपणा, काम करण्याची पद्धत, योग्य नियोजन यामुळे संपूर्ण बंजारा समाज भाजपच्या पाठीशी एकतर्फी उभा राहिला व महायुतीला भरघोस मतदान करून सत्तेत बसवण्यात त्यांचा खूप मोठा सिंहाचा वाटा आहे. या सर्व कार्याची दखल घेऊन लोकप्रिय मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांनी राज्यातील तांड्याचा विकास व्हावा, समाजाला अर्थकारण, उद्योग, शिक्षण याच्या माध्यमातून मुख्य प्रवाहात आणण्यासाठी दिलेला शब्द पूर्ण करून संत सेवालाल महाराज बंजारा/लभाण तांडा समृद्धी योजना जाहीर केली. याच्या माध्यमातून तांड्याना महसूली दर्जा देण्यात येणार आहे. व स्वतंत्र ग्रामपंचायत म्हणून नवीन ओळख मिळणार आहे. या माध्यमातून विविध विकास योजना राबविण्यात येणार आहे.



तांडे वस्ती येथे स्मशानभूमी, समाजमंदिर, रस्ते, नाली, युवा उद्योग, महिला सक्षमीकरण, बंजारा क्लस्टर, शैक्षणिक उपक्रम, रोजगार मेळावे, स्मार्ट तांडा अशा विविध प्रकारची विकासकामे, घरकुल, सामाजिक, सांस्कृतिक उपक्रम तसेच आवश्यक सर्व मूलभूत गरजा पूर्ण करण्यासाठीची कामे मंजूर करण्यात येणार आहेत. यासाठी एक अशासकीय कमिटी ग्रामविकास मंत्री यांच्या अध्यक्षतेखाली गठित करण्यात आली होती. मंत्री जयकुमार गोरे ही योजना प्रभावीपणे चालावी करिता स्वतः लक्ष देत असून योजना राज्य समन्वयक म्हणून जगदीशजी साकवान साहेब, निलेश जाधव यांच्या सूचनेप्रमाणे राज्यातील राज्य समिती प्रमुख महंत जितेंद्र महाराज पोहरादेवी यांची निवड करण्यात आली आहे. तसेच इतर अशासकीय सदस्यात श्रावण चव्हाण, डॉ.मोहन चव्हाण, रविकांत राठोड, नंदू भाऊ पवार इत्यादींचा समावेश करण्यात आला आहे. मराठवाड्यातील तांड्यावर जास्तीत जास्त निधी पोहचावा, तांड्याचा विकास व्हावा व समाजाला मुख्य प्रवाहात सामावून घेता यावे यासाठी ऍड. पंडित भाऊ राठोड यांना मराठवाड्यातील आठ जिल्ह्यांची जबाबदारी देऊन प्रमुख करण्यात आले आहे . त्यांच्या निवडीने एक कार्यक्षम नेतृत्व समाजाला मिळाले आहे. धर्मगुरु विधान परिषद आमदार परमपूज्य बाबूसिंगजी महाराज पोहरादेवी यांचे आशीर्वाद घेऊन व कायम खंबीर पाठीशी उभे राहून मार्गदर्शन करणारे प्रेरणा देणारे प्रेरणास्थान आरोग्यदूत मुख्यमंत्री वैद्यकीय मदत कक्ष राज्याचे प्रमुख रामेश्वर भाऊ नाईक यांच्या मार्गदर्शनाखाली योजना राबविण्यात येत आहे. अँड पंडीत भाऊ राठोड हे मराठवाडा विभागातील सर्व सदस्य यांचे सोबत विभागीय आयुक्त संभाजी नगर यांची भेट घेऊन संपूर्ण मराठवाडा तांडा, वाडी, वस्ती संपर्क अभियान राबविण्यात येणार आहे. त्यांच्या समस्या अडचणी जाणून घेऊन त्या पूर्ण करण्यासाठी शासन दरबारी प्रयत्न करणार आहेत. एक युवा नेते कर्तव्यदक्ष तळागाळात राहून काम करणारे नेतृत्व म्हणून समाज त्यांना ओळखतो. त्यांचा रूपाने एक उमदे नेते समाजाला मिळाले आहे. सर्व स्तरातून त्यांच्यावर शुभेछ्या व कौतुकाचा वर्षाव होत आहे. नक्कीच दिलेली जबाबदारी पार पाडून समाजासाठी मी सदैव कोणतीही अपेक्षा न ठेवता काम करणार असून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस साहेब यांना अपेक्षित समाजाचा विकास करणार आहे. जे काही सरकारकडून माझ्या समाजासाठी त्यांच्या विकासासाठी घेता येईल ते सर्व मागण्या मान्य करून घेण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे आश्वासन त्यांनी दिले आहे.



## धनेगाव येथे २५ वर्षांनी एकवटले बालमित्र

केज/प्रतिनिधी

बालपणीच्या आठवणीत मैत्रीभाव जोपासण्यासाठी तब्बल २५ वर्षांनी सर्व मित्रांनी एकत्र येत गेट-टुगेदर कार्यक्रमाचे आयोजन केले होते. या कार्यक्रमाला बालमित्रानी उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.तालुक्यातील धनेगाव येथे १९९९- २००० सातवी बॅचच्या मित्रांनी एकत्र येऊन बालपणीच्या आठवणीना उजाळा देण्यासाठी जिल्हा परिषदेच्या शाळेत इयत्ता पहिली ते सातवी पर्यंत शिक्षण घेतलेल्या इयत्ता सातवीच्या बाल मित्रांनी मेळावा घेत पुन्हा एकदा बालपणीचा आठवणी ताज्या केल्या.शाळेची घंटा वाजवून राष्ट्रगीत,प्रार्थना,परिपाठ घेऊन विद्यार्थ्यांनी पुन्हा एकदा बालपणीची शाळा अनुभवली.२५ वर्षापूर्वी ज्ञानदान केलेल्या शिक्षकांवर पुष्पवृष्टी करत त्यांचा सन्मान करत ऋण व्यक्त केले.कार्यक्रमानंतर स्नेहभोजन करून कार्यक्रमाची सांगता करण्यात आली. यावेळी सण १९९९ - २००० साली कार्यरत असलेले शिक्षक श्री.सोमवंशी,श्री. आरेकर,श्री. हांडीबाग,श्री.निपानिकर,श्री. शिखारे त्याचबरोबर भोसले दत्तात्रय वैजनाथ,नवनाथ जगताप,शिवप्रसाद स्वामी. सुरेखा मुळे,शुभांगी गुजर,स्वाती गुजर,सुनिता गुजर यांच्यासह इतर विद्यार्थी,विद्यार्थिनी उपस्थित होते.

# हर घर तिरंगा मोहीम, मनपाच्या तिरंगा बाईक रॅलीस उत्स्फूर्त प्रतिसाद.

लातूर/प्रतिनिधी :- हर घर तिरंगा मोहीम २०२५ अंतर्गत लातूर शहर महानगरपालिकेतील वाहन विभागाच्या वतीने मंगळवार दि. १२ रोजी तिरंगा बाईक रॅली काढण्यात आली.या रॅलीस उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.महानगरपालिकेचे सर्व कर्मचारी व अधिकारी रॅलीत सहभागी झाले होते.

मनपामार्फत हर घर तिरंगा मोहीम २०२५ अंतर्गत विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. तिरंगा बाईक रॅली हा त्याचाच एक भाग होता. प्रतीवर्षीप्रमाणे यावर्षी सुध्दा या रॅलीचे आयोजन करण्यात आले. नागरिकांमध्ये देशभक्तीपर वातावरण तयार करण्यासाठी तसेच राष्ट्रीय एकात्मता निर्माण करण्यासाठी या तिरंगा बाईक रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. सकाळी ८ ते १० या कालावधीत ही रॅली संपन्न झाली.

मनपाचे कर्मचारी व अधिकाऱ्यांनी टी शर्ट, टोप्या व तिरंगी झेंडे यासह रॅलीत सहभाग नोंदविला.डॉ. बाबासाहेब आंबेडकर पार्क येथे बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रतिमेला मनपा अधिकारी अतिरिक्त आयुक्त व मुख्य लेखाधिकारी यांच्याकडून पुष्पहार घालून रॅलीची सुरूवात करण्यात आली.डॉ.बाबासाहेब आंबेडकर पार्क ते छत्रपती शिवाजी महाराज चौक,राजीव गांधी चौक परत छत्रपती शिवाजी महाराज चौक, गांधी चौक,गंजगोलाई ते महानगरपालिका कार्यालय या मार्गावरून ही रॅली काढण्यात आली. मनपा कार्यालयात छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेला हार घालण्यात आला. राष्ट्रगीताने तिरंगा बाईक रॅलीचा समारोप झाला.










या रॅलीच्या यशस्वी आयोजनासाठी आयुक्त श्रीमती मानसी अतिरिक्त आयुक्त तथा नोडल अधिकारी, देविदास जाधव तसेच उपायुक्त पंजाबराव खानसोळे यांच्या मार्गदर्शनाखाली वाहन विभाग प्रमुख पवन दगडू सुरवसे यांनी उत्तम नियोजन केले.

या रॅलीमध्ये सहायक आयुक्त नंदकिशोर तपाडिया,स्वच्छता विभाग प्रमुख रमाकांत पिडगे, क्षेत्रीय अधिकारी बंडू किसवे, संतोष लाडलापुरे,समाधान सुर्यवंशी, भांडारपाल बालाजी शिंदे,विद्युत विभाग प्रमुख जे. एम. ताकपिरे,जनसंपर्क अधिकारी रूक्मानंद वडगावे,अग्निशामक अधिकारी चौधरी,अतिक्रमण विभाग प्रमुख रवि कांबळे यांच्यासह अधिकारी व कर्मचाऱ्यांनी स्वयंप्रेरणेने सहभाग नोंदवला.

# माजी मुख्यमंत्री, माजी केंद्रीय मंत्री, लोकनेते विलासराव देशमुख यांच्या स्मृतिदिनानिमित्त आदरांजली सभा

## पंडित रघुनंदन पणशीकर यांच्या 'संतवाणी' कार्यक्रमाचे आयोजन

लातूर / प्रतिनिधी :- महाराष्ट्र राज्याचे माजी मुख्यमंत्री, माजी केंद्रीय मंत्री, लोकनेते विलासराव देशमुख साहेब यांच्या १३ व्या स्मृतिदिनानिमित्त १४ ऑगस्ट २०२५ रोजी सकाळी ९ वाजता बाभळगाव येथील विलास बागेत सार्वजनिक आदरांजली सभेचे आयोजन करण्यात आले आहे. या प्रसंगी जयपूर-अत्रौली घराण्याचे प्रख्यात शास्त्रीय गायक पंडित रघुनंदन पणशीकर यांचा भक्ती संगीत आणि 'संतवाणी'चा विशेष कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. माजी मुख्यमंत्री विलासराव देशमुख यांच्या स्मृतिदिनाच्या निमित्ताने, त्यांच्या दूरदृष्टीच्या नेतृत्वाला उजाळा देणे महत्त्वाचे आहे. विलासरावजी केवळ एक राजकारणी नव्हते, तर ते एक सकारात्मक दृष्टिकोन असलेले नेते होते. त्यांनी आपल्या विचारांनी, धोरणांनी आणि विकासकामांनी महाराष्ट्राला एका नव्या उंचीवर नेले. लोकसेवेला वाहिलेले त्यांचे जीवन, सुसंवादी नेतृत्व आणि सर्वांना सोबत घेऊन जाण्याची त्यांची वृत्ती आजही आपल्याला प्रेरणा देत राहते. त्यांनी राजकारण आणि विकास यांची सांगड घालून राज्याच्या सर्वांगीण प्रगतीचा मार्ग प्रशस्त केला.

अशा लोकनेत्याला आंदराजली अर्पन करण्यासाठी आयोजीत करण्यात आलेल्या सभेत पंडित रघुनंदन पणशीकर यांच्या शास्त्रीय गायनाच्या संतवाणी कार्यक्रमाचे आयोजन करण्याज आले आहे. जयपूर-अत्रौली घराण्याचे पंडित रघुनंदन पणशीकर हे प्रख्यात शास्त्रीय गायक म्हणून ओळखले जातात. त्यांची गायनशैली या घराण्याची अनन्यसाधारण ओळख दर्शवते, ज्यामध्ये भरलेला आकार, तान, लयकारी आणि अतिशय सुरेखपणे घेतलेली मींड व गमक यांचा



समावेश असतो. ख्याल गायकी असो, भजन, ठुमरी, गझल किंवा नाट्यसंगीत, ते प्रत्येक प्रकार अगदी सहजतेने गातात. त्यांच्या या बहुआयामी प्रतिभेमुळे त्यांनी भारतीय शास्त्रीय संगीतात एक महत्त्वपूर्ण स्थान निर्माण केले आहे. त्यांनी भारतच नव्हे, तर युरोप, अमेरिका आणि आखाती देशांमध्येही आपल्या गायकीने श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले आहे. या कार्यक्रमाची सुरुवात सकाळी बरोबर ९ वाजता होणार असून, देशमुख कुटुंबीयांच्या वतीने सर्वांना सकाळी ठीक ८.५५ वाजेपूर्वी विलास बागेतील स्मृतीस्थळी स्थानापन्न होण्याची नम्र विनंती करण्यात आली आहे. या कार्यक्रमाचे सुत्रसंचालन बाळकृष्ण धायगुडे करणार आहेत.

## आज आ. रमेशआप्पा कराड यांचा भादा येथे चौथा जनता दरबार होणार

लातूर दि. १२ - लातूर ग्रामीणचे आमदार श्री रमेशआप्पा कराड यांच्या प्रमुख उपस्थितीत येत्या १३ ऑगस्ट २०२५ बुधवार रोजी लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघात असलेलेल्या औसा तालुक्यातील भादा येथील लक्ष्मी मंगल कार्यालय, वडजी रोड येथे जनता दरबार आयोजित करण्यात आला असून आ. कराड यांचा हा चौथा जनता दरबार आहे.



गोरगरीब सर्वसामान्य आणि तळागाळातील माणसाचे प्रश्न, अडीअडचणी आणि व्यथा समजून घेण्यासाठी त्यांच्याशी संवाद साधण्यासाठी लातूर ग्रामीण मतदार संघात दर तीन महिन्याला लातूर तालुक्यात दोन, रेणापूर तालुक्यात एक आणि भादा सर्कल मध्ये एक याप्रमाणे चार ठिकाणी जनता दरबार घेण्यात येणार असल्याचे आ. रमेशआप्पा कराड यांनी घोषित केले होते. त्यानुसार लातूर तालुक्यातील मुरुड, ममदापूर आणि रेणापूर येथे नुकताच जनता दरबार घेण्यात आला. या तीन्ही ठिकाणी सर्व स्तरातील नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. बऱ्याच जणांचे प्रश्न जागेवरच निकाली निघाले तर अनेक प्रश्नांना सोडविण्यासाठी संबंधित अधिकाऱ्यांना सूचना देऊन महिनाभरात प्रश्न निकाली काढण्याचे सांगितले.

येत्या १३ ऑगस्ट २०२५ बुधवार रोजी औसा तालुक्यातील भादा जिल्हा परिषद सर्कल मधील जनतेचा भादा येथील लक्ष्मी मंगल कार्यालयात सकाळी १० वाजता लातूर ग्रामीणचे आमदार श्री. रमेशआप्पा कराड यांच्या उपस्थितीत जनता दरबारचे आयोजन करण्यात आले आहे. तेव्हा भादा सर्कलमधील वाडी वस्तीसह विविध गावच्या जनतेने आपल्या समस्यांचे निरसन करण्यासाठी जनता दरबार येथे आवर्जून उपस्थित रहावे असे आवाहन संयोजकाच्या वतीने करण्यात आले आहे.

# संपादकीय

## ‘सिंह’गर्जना!

मूळचे शिकारी असलेले जिम कॉर्बेट यांना जंगलातील नैसर्गिक वाघ-सिंहांची संख्या कमी होत आहे, हे लक्षात आल्यावर, त्यांनी बंदुकीऐवजी कॅमेरा वापरून वाघ-सिंह आणि अन्य वन्यजीव टिपले. त्यांच्या दूरदृष्टीमुळेच भारतात वन्यजीवांना भयमुक्त वातावरणात राहता यावे म्हणून अभयारण्ये घोषित केली. टप्प्याटप्प्याने पावले टाकल्यामुळे भारतात अभयारण्यांचा विकास झाला; पण त्याचवेळी काही ठिकाणी जंगलांमध्येही मानवी अतिक्रमणे झाली, हस्तक्षेप वाढला, विकासाच्या नावाखाली जंगलांची कत्तल झाली; पण सर्वच गोष्टी प्रतिकूल आहेत, असे नाही. या विध्वंसापासून योग्य तो धडा घेतला जात असल्याचे आशादायक चित्र किमान पर्यावरण रक्षणाबाबतीत तरी आहे, असे म्हणता येण्यासारखी स्थिती वन्यजीवरक्षणाबाबत दिसते.

भारतातील आशियाई सिंहांची संख्या गेल्या पाच वर्षांत ६७४ वरून ८९१ वर पोहोचली आहे. म्हणजेच पाच वर्षांत ३२.२ टक्के वाढ झाल्याचे १६ व्या सिंहगणनेतून स्पष्ट झाले. सिंहांचे निवास क्षेत्रही लक्षणीय प्रमाणात वाढले. पहिल्यांदाच २२ सिंह ‘लायन कॉरिडोर’ भागात दिसून आले. याचा अर्थ कॉरिडोर निर्माण केल्याचा नक्कीच फायदा झाला. गुजरातच्या बारडा अभयारण्यात, तसेच जेतपूर, बाबरा-जसदान आणि अन्य परिसरात ४९७ सिंह आढळले. त्यांच्या पुनरुत्पादनाच्या दृष्टीने चांगली गोष्ट म्हणजे, त्यांच्या उत्पादक क्षमतेत वाढ झाली. प्रौढ माद्यांची संख्या २७ टक्क्यांनी वाढून, ती २६० वरून ३३० पर्यंत पोहोचली. सर्वाधिक सिंहसंख्या अमरेली जिल्ह्यात असून, तेथे ८२ प्रौढ नर, ११७ प्रौढ माद्या आणि ७९ छावे आहेत.

मितियाळा अभयारण्य व आसपासच्या क्षेत्रात सिंहांच्या संख्येत १०० टक्के वाढ झाली. धक्कादायक बाब म्हणजे, जे गिरनारचे अभयारण्य जगात प्रसिद्ध आहे, तेथील सिंहांच्या संख्येत मात्र ४ टक्के घट झाली. तसेच भावनगर किनारा क्षेत्रातही १२ टक्के घट दिसून येते. सिंहांचा अधिवास आणि संख्या जेथे वाढली तेथेच याचे प्रमाण कमी झाले, त्यावरून कोणत्या उपाययोजना कराव्यात, याचा निर्णय आता घेता येऊ शकेल. एकेकाळी तुर्कस्तानपासून भारतापर्यंत सिंहांचे साम्राज्य होते; पण आता ते फक्त गुजरातच्या सौराष्ट्र भागापुरते मर्यादित राहिले असले, तर ती चिंतेचीच बाब मानली पाहिजे. १० ऑगस्ट हा ‘विश्व सिंह दिन’ म्हणून साजरा केला जातो. संपूर्ण जगात केवळ १५ हजारांच्या आसपास सिंह अस्तित्वात असून, भारतात गुजरात सोडून इतरत्र कुठेही सिंहांचा वावर नाही, ही भारतासाठी काळजीचीच बाब.

गुजरातमधील गीर राष्ट्रीय उद्यानाचे क्षेत्र २५८ चौ. किलोमीटर असून, त्या सभोवतीच्या १,४०० चौ. किलोमीटर परिसरात सिंह वावरताना बघायला मिळतात. पूर्वीच्या काळात मध्य प्रदेश व राजस्थानातही सिंह होते; पण १८७० च्या आसपास राजस्थान आणि १८८० च्या आसपास मध्य प्रदेशमधून ते नामशेष झाले. २० व्या शतकाच्या आरंभी तत्कालीन नवाब मुहम्मद रसूलखांजी बीबी यांना जुनागड जिल्ह्यात फक्त डझनभर सिंह शिल्लक राहिल्याचे लक्षात आले. त्यांनी गीरच्या जंगलास संरक्षित क्षेत्र घोषित केले. स्वातंत्र्योत्तर काळात, खासकरून गेल्या तीन दशकांत गुजरात सरकारच्या अथक प्रयत्नांमुळे २०१५ साली तेथील सिंहांची संख्या सुमारे सव्वापाचशे झाली आणि आता तर ती लक्षणीय वाढली. गीर उद्यानाच्या बाहेर सिंहांचा वावर वाढला. ते समुद्रकिनार्यालगत उत्तरेकडे पसरू लागले.

अर्थात, काहीवेळा सिंहांचे कळप हमरस्त्यावरूनही भटकताना दिसल्याची छायाचित्रे आणि चलचित्रे समोर आली आहेत. गुजरात वन विभागाने त्यांच्या संरक्षणासाठी स्थानिक लोकांना ‘वनमित्र’ म्हणून नियुक्त केले. कधी कधी सिंहांनी कोणाची गुरे मारली, तर त्यांच्यावर जमाव हल्ला करण्याची शक्यता असते. अशावेळी वन कर्मचार्यांच्या मदतीने सिंहांवर कोणी हल्ला करू नये, याची काळजी घेतली जाते. अशा उपायांमुळेच समुद्रकिनार्यालगतही सिंहांची संख्या वाढली. गीर राष्ट्रीय उद्यानातील पावणेतीनशे सिंह तर उद्यानाच्या बाहेर आढळून येतात. गुजरातचा सिंह आता पोरबंदरपर्यंतही पोहोचलाय. मात्र, २०१८ साली एका विषाणुजन्य आजाराने तेथे २२ सिंह मृत पावले.

२०१६-१७ मध्ये गुजरातेत सुमारे १८४ सिंहांचा मृत्यू झाला आणि त्यातील ३२ मृत्यू अनैसर्गिक होते. विषाणुजन्य आजार हे त्याचे कारण असल्याचा संशय आल्यावर, यापैकी काही सिंह मध्य प्रदेशातील शिवपूर व मोरैना जिल्ह्यातील कुनो राष्ट्रीय उद्यानात पाठवण्याचा निर्णय घेतला. त्यासाठी २४ गावांतील १,६०० कुटुंबांचे इतरत्र पुनर्वसन केले गेले. कुनो अभयारण्याचा विस्तार करून, त्याभोवती विशाल बफर क्षेत्र घोषित केले गेले. सैबेरिया या थंड प्रदेशात मूळ स्थान असलेला वाघ १२ हजार वर्षांपूर्वी भारतात आला आणि क्रमाक्रमाने सरकत दक्षिणेच्या टोकापर्यंत गेला. माजी पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी वाघांसाठी ‘प्रोजेक्ट टायगर’ सुरू केला. वाघांनी हल्ले करून तेथील सिंहांची संख्या कमी केली.

अनेक वर्षे केवळ व्याघ्र संवर्धनावरच लक्ष्य केंद्रित केले गेले. एकेकाळी सिंह सर्व भारतभर आढळत होता. देशात सर्वत्र त्याच्यासाठी पोषक वातावरण आहे. योग्य प्रयत्न केल्यास, त्याचे अस्तित्व देशभर पुन्हा दिसू लागेल, असे मत दिवंगत वनसंशोधक मारुती चितमपल्ली यांनी व्यक्त केले होते. ‘ग्लोबल बायो डायव्हर्सिटी इंडेक्स’नुसार, ब्राझील हा पहिल्या क्रमांकावर असून, भारताचा क्रमांक आठवा लागतो. भारतात अंदाजे पक्ष्यांच्या १,२१२ प्रजाती, उभयचर प्राण्यांच्या ४४६, माशांच्या २,६०१, सस्तन प्राण्यांच्या ४४० आणि वनस्पती प्रजाती ४५ हजारांपेक्षा जास्त आहेत. या वनस्पती आणि प्राण्यांपासून मानवाला अन्न, निवारा, औषध आणि ऊर्जा मिळते. संपूर्ण पृथ्वीवरील जीवन व मानवाचे जीवन प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्षरीत्या जैवविविधतेवर अवलंबून आहे. जैवविविधतेच्या दृष्टीने वन्यप्राण्यांचे महत्त्वही विलक्षण आहे. जसजसे विषुववृत्तापासून दूर जाऊ, तसतशी जैवविविधता कमी कमी होत जाते. आफ्रिकेचा मध्यभाग, ॲमेझॉनचे खोरे, इंडोनेशिया व भारतात जैवविविधता मोठी आहे. ती जपण्याच्या दृष्टीने वनांमधील प्राण्यांचे आणि वाघ-सिंहांचेही सातत्यपूर्ण जतन-संवर्धन गरजेचे आहे.

# शेतीमाल निर्यातीचे आश्वासक चित्र

अन्नधान्य आणि इंधनाच्या किमती लक्षणीयरीत्या घसरल्याने, जूनमध्ये घाऊक किंमत निर्देशांकावर आधारित महागाईदर ०.१३ टक्क्यांवर घसरला असल्याची सुवार्ता आहे.

भारतातील कृषिमालाच्या बाजारपेठेवर अमेरिकेचे लक्ष असून, त्यासाठी अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प भारतावर जे दडपण आणत आहेत, त्याविरुद्ध केंद्र सरकारने ठाम राहायला हवे. अन्यथा हजारो शेतकर्यांच्या जीवनावर विपरीत परिणाम होणार आहे. मात्र त्याचवेळी भारतातील निर्यातीबाबत अतिशय आश्वासक असे चित्र असल्याची आकडेवारी उपलब्ध झाली आहे. २०२४-२५ मध्ये भारताने त्या अगोदरच्या वर्षापेक्षा ०.१% जास्त, म्हणजे ४३७.४ अब्ज डॉलरच्या एकूण मालाची निर्यात केली. आता एप्रिल ते जून २०२५ मधील ताजी आकडेवारी उपलब्ध झाली असून, या तिमाहीतील निर्यात ११२ अब्ज डॉलर्सवर गेली आहे.यामध्ये सर्वात स्पृहणीय बाब म्हणजे, भारताच्या शेतीमालाच्या निर्यातीत ६.४% वाढ झाली आहे.



२०२३-२४ मध्ये ती ४८.८ अब्ज बिलियन डॉलर्स होती. तर २०२४-२५ यंदाच्या पूर्ण वर्षात कृषिमालाची एकूण निर्यात ५५ अब्ज डॉलर्सपर्यंत जाऊन पोहोचेल, असा अंदाज आहे. एप्रिल ते जून २०२५ मध्ये कृषिमाल निर्यातीत ५.८ टक्के वाढ झाली आहे. जानेवारी ते जून २०२५ या सहा महिन्यांच्या काळाचा विचार केल्यास, अमेरिकेला केल्या जाणार्या भारताच्या शेतीमाल निर्यातीत २४ टक्क्यांची भरघोस वाढ झाली आहे. त्यावेळी ट्रम्प यांची घातक धोरणे अमलात आली नव्हती. एक लक्षात घेतले पाहिजे, की डॉ. मनमोहन सिंग यांच्या कालावधीत आणि शरद पवार कृषिमंत्री असताना, भारताच्या शेतीमालाची निर्यात दहा वर्षांत साडेसात अब्ज बिलियन डॉलर्सवरून ४३ अब्ज बिलियन डॉलर्सवर जाऊन पोहोचली.

अशाप्रकारची नेत्रदीपक कामगिरी त्या अगोदर कधीही झाली नव्हती. २०१३-१४ ते २०२०-२१ या दरम्यान, भारताच्या शेतीमाल निर्यातीत उतार आला होता. २०२२-२३ मध्ये त्यात पुन्हा तेजी आली. कारण शेतीमालाचे जगातील भाव वाढायला लागले होते. २०२३-२४ मध्ये मात्र भारतात दुष्काळ पडला. महागाई होऊ लागल्यामुळे नरेंद्र मोदी सरकारने गहू, तांदूळ, साखर, कांदा यासारख्या वस्तूंच्या निर्यातीवर बंधने आणली. यथावकाश हे निर्बंध हळूहळू कमी करण्यात आले. गेल्यावर्षी पाऊस चांगला पडल्यामुळे शेतीमालाचे उत्पादन वाढले. त्यामुळे भाववाढही कमी झाली होती.

यावर्षीही चांगला पाऊस पडल्यामुळे सरकारला साखरेवरील निर्यात निर्बंध हटवणे शक्य आहे. २०२२-२३ मध्ये साखरेची निर्यात साडेपाच अब्ज डॉलर्स इतकी होती. मागच्या तिमाहीत मात्र बिगरबासमती तांदूळ, कॉफी, तंबाखू, फळे व भाज्या आणि सागरी उत्पादने यांच्या निर्यातीत लक्षणीय वाढ झाली आहे. ब्राझील आणि व्हिएतनाममधील कॉफीचे उत्पादन घटल्याकारणाने कॉफीनिर्यातीच्या बाजारपेठेत भारताला मुसंडी मारणे शक्य होत आहे. अन्नधान्य आणि इंधनाच्या किमती लक्षणीयरीत्या घसरल्याने, जूनमध्ये घाऊक किंमत निर्देशांकावर आधारित महागाईदर ०.१३ टक्क्यांवर घसरला असल्याची सुवार्ता आहे. ऑक्टोबर २०२३ नंतर प्रथमच घाऊक महागाईदर हा शून्याखाली गेला आहे.

यावेळच्या मे महिन्यात अन्नधान्यांच्या वस्तूंत १.५६ टक्के, तर जूनमध्ये पावणेचार टक्क्यांची घसरण झाली. इंधन आणि विजेच्या किमतीही २.६५ टक्क्यांनी जूनमध्ये कोसळल्या. तर उत्पादित वस्तूंच्या किमतींतील वाढ जूनमध्ये फक्त १.९७ टक्के इतकी होती. सणासुदीचे दिवस जवळ आल्यामुळे सर्वसामान्य जनतेच्या दृष्टीने महागाईबाबत दिलासा मिळणे, हे फार महत्त्वाचे आहे.

२०२४ च्या अर्थसंकल्पातच ‘खाद्यतेल मिशन’ची घोषणा करून, त्यासाठी १० हजार कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली होती. कडधान्यांत आत्मनिर्भरता साधण्यासाठीही सहा वर्षे कालावधीची दीर्घकालीन योजना राबवली जाणार आहे. संपूर्ण खाद्यतेल आत्मनिर्भरता निदान पुढील २० वर्षांत तरी शक्य नसली, तरी मागील अनुभव पाहिल्यास कडधान्यांतील आत्मनिर्भरता येत्या दोन वर्षांत गाठणे शक्य होईल, असा तज्ज्ञांचा अंदाज आहे. कारण डाळींची टंचाई फार तीव्र नाही. तूर, मूग आणि मसूर या खाण्यासाठी वापराच्या दृष्टीने एकमेकींशी संलग्न असलेल्या डाळींचे एकूण उत्पादन जरी ३०-३५ लाख टनांनी वाढले, तरी ते पुरेसे आहे. कारण क्षेत्रवाढ आणि उत्पादकतावाढ असा दुहेरी प्रयत्न करून चण्याच्या उत्पादनातदेखील १०-१५ लाख टन वाढ सहज शक्य आहे. म्हणजे एकूण अतिरिक्त उपलब्धता ५० लाख टनांची झाल्यास आपण किमान कडधान्यांत आत्मनिर्भर होऊ शकू.

कडधान्यांच्या क्षेत्रात २०१७ ते २०२१ या काळात भारत ८५ ते ९० टक्के आत्मनिर्भर होता. मागच्या अर्थसंकल्पात पंचवार्षिक कालावधीचे ‘कापूस मिशन’ सुरू करण्याची घोषणा झाली. त्यात उत्पादकतावाढ आणि शाश्वतता या गोष्टींवर भर देण्यात आला आहे. उत्तम दर्जाच्या कापूस उत्पादनावर लक्ष्य केंद्रित करण्यात आले आहे. याव्यतिरिक्त मत्स्य उत्पादन आणि निर्यातीला उत्तेजन देण्यासाठी ‘पंतप्रधान धनधान्य कार्यक्रमांतर्गत’ १०० जिल्ह्यांत उत्पादकतावाढ अभियान राबवले जात आहे. भारतीय अर्थव्यवस्था स्थिर व समर्थ असून, नवनव्या संधी उपलब्ध होत असल्याचे आशादायी चित्र रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर संजय मल्होत्रा यांनी अलीकडेच रंगवले आहे.

मात्र भाववाढ कमी झाली असली, तरी शेतकर्यांच्या मालाला पुरेसे भाव मिळत नाहीत आणि अतिवृष्टीमुळे तो अडचणीतही आला आहे. त्याचप्रमाणे देशातील उत्पादनक्षेत्राचा विकास अपेक्षेप्रमाणे नाही. गोरगरिबांचा शिक्षण, प्रवास आणि आरोग्यावरचा खर्च दिवसेंदिवस वाढत चालला आहे. अर्थव्यवस्थेच्या कमजोर स्थळांवर लक्ष्य केंद्रित केल्यासच गोरगरीब वर्ग व शेतकर्यांना खरा दिलासा मिळू शकेल. ट्रम्प यांच्या दादागिरीस प्रत्युत्तर दिल्यास, शेतकर्यांचे हितसंबंध सुरक्षित राहतील.

# माझं काय चुकलं?

असा प्रश्न बहुतांश वेळा माणूस तेव्हाच विचारतो, जेव्हा आयुष्यात एखादं अनपेक्षित दुःख येतं, अन्याय वाटावा असा प्रसंग घडतो किंवा एखादी संधी हातून निघून जाते आणि त्या प्रत्येक वेळी आपण सहजपणे हे सगळं कुणीतरी वर बसलेल्या देवाच्या नावे खपवतो, त्याच्यावरच दोष ढकलतो आणि त्याला खोटं पाडण्याचा प्रयत्न करतो; पण मुळात आपल्याला हा प्रश्न देवाला विचारण्यापेक्षा स्वतःच्या अंतर्मनाला विचारायला हवा, कारण आपलं मन हेच आपल्या प्रत्येक कृतीचं, विचारांचं आणि निर्णयाचं खरंखुरं प्रतिबिंब असतं, तेच आपल्याला जाणीव करून देतं की आपण जे काही करतो, जे काही बोलतो, जे काही ठरवतो, त्यामागे खरोखर कोणते हेतू होते, त्या कृतींचे दुरगामी परिणाम काय होते आणि आपण कोणाच्या भावना दुखावल्या होत्या की नाहीत; देव म्हणजे एक अदृश्य न्यायाधीश आहे हे मान्यच, पण त्याच न्यायाची एक अत्यंत स्पष्ट आणि कधीही न मिटणारी प्रत आपल्याच अंतःकरणात असते आणि तीच आपली खरी परीक्षा घेत असते, म्हणून जेव्हा आपण सतत स्वतःला निर्दोष समजून जगत राहतो, तेव्हा ही अंतर्मनातील न्यायसंस्था आपल्याला गप्प बसू देत नाही, मन कधी कधी अकारण अस्वस्थ होतं, झोप लागत नाही, शांततेचा भंग होतो आणि आपण म्हणतो, काय झालय मला? पण खरंतर हे आपल्याच मनात खोलवर साठून राहिलेल्या कृतींचं आणि विचारांचं प्रतिबिंब असतं; प्रत्येक माणूस आयुष्यात चुकीचे निर्णय घेतो, प्रसंगी स्वार्थीही होतो, कुणाचे तरी स्वप्न मोडतो, एखाद्याचं अपमान करतो, आत्मसन्मान दुखावतो, आणि नंतर त्यावर पांघरून घालतो - हाच मानव स्वभाव आहे, परंतु हे सगळं विसरलेलं असलं तरी आपलं अंतर्मन काहीही विसरत नाही, त्याच्या कप्प्यात प्रत्येक चूक नीट नोंदवलेली असते आणि ती योग्य वेळ आल्यावर हळूहळू वर येते, त्यातून पश्चात्ताप, अपराधगंड, निराशा आणि एकाकीपणाची भावना निर्माण होते, पण आपण मात्र त्याचा उगम शोधण्याऐवजी त्याचे खापर परिस्थिती, नशीब किंवा देवावर फोडतो; जर खरंच आत्मपरीक्षण करून आपण आपल्या प्रत्येक कृतीचा अभ्यास केला, तर आपल्या चुकांचं मूळ आपल्यातच आहे हे स्पष्ट होतं, उदाहरणार्थ एखादं नातं दुरावलं असेल तर त्यात फक्त समोरच्याचा दोष शोधण्याऐवजी आपणही कुठे कठोर बोललो का, कुठे अपमान केला का, कुठे समजून न घेता निर्णय घेतला का, हे स्वतःलाच विचारायला हवं, कारण अशा नात्यांच्या तुटण्यामागे अनेकदा आपल्याही काही कृती जबाबदार असतात, पण आपल्याला स्वतःची बाजूच योग्य वाटत राहते; याउलट अंतर्मनाशी प्रामाणिक संवाद साधला, तर हे सगळं स्पष्ट होतं, म्हणून जेव्हा आपण माझं काय चुकलं? असं म्हणतो, तेव्हा त्यामागे असलेली आंतरिक अस्वस्थता, गोंधळ आणि निरुपायता स्पष्ट दिसते, पण त्या गोंधळातून मार्ग फक्त आपलं अंतर्मनच दाखवू शकतं, कारण ते खोटं बोलत नाही, ते आपल्यालाच आपली आरशी दाखवत राहतं, पण अनेकदा आपणच त्या आरशाकडे बघायचं टाळतो, आपल्यालाच खरी गोष्ट सांगणारा हा अंतःस्वर आपणच दाबून टाकतो आणि मग बाह्य गोष्टींवर दोष ढकलण्याची प्रक्रिया सुरू होते; आपली चूक आपल्याला लगेच समजत नाही, ती काळाच्या ओघात, परिणामाच्या स्वरूपात समोर येते आणि तेव्हा त्या वेळी घेतलेला एखादा चुकीचा निर्णय, त्या प्रसंगी वापरलेले कडक शब्द, किंवा केलेली दुर्लक्षाची कृती आठवते, त्याची खंत वाटते, पण खंत वाटणं हे समाधानकारक आहे कारण त्यातून सुधारणा होते, खरी भीती तेव्हा वाटते जेव्हा माणूस चूक करूनही आपल्याला काहीच वाटत नाही असं म्हणतो, कारण तेव्हा त्याचं मन त्या चुकीशी तडजोड करतं आणि त्याच्या नैतिकतेचं पतन होतं; म्हणूनच माझं काय चुकलं? हा प्रश्न देवाला विचारण्याऐवजी तोच प्रश्न प्रामाणिकपणे स्वतःच्या अंतःकरणाला विचारणं आवश्यक आहे, कारण देवाच्या कृपेची, कृपारूपी शिक्षा देण्याची वेळ फार उशिराने येते, पण अंतर्मनाचं न्यायालय सतत कार्यरत असतं, ते आपल्याला प्रत्येक निर्णयानंतर, प्रत्येक कृतीनंतर, प्रत्येक नात्याच्या व्यवहारानंतर फीडबॅक देत असतं, आपण तो ऐकतो का, यावर आपली आत्मिक प्रगती अवलंबून असते; आज समाजात सर्वत्र एक विचित्र मानसिकता तयार झाली आहे की स्वतःला निर्दोष सिद्ध करत, दुसऱ्यांवर आरोप करणं हे सहज झालं आहे, सगळं चुकतंय कारण माझं नशीब खराब आहे, लोकच वाईट आहेत, माझ्यावरच का सगळं येतं? अशा वाक्यांनी आपण स्वतःला समजावत राहतो, पण खरंतर या वाक्यांच्या आड स्वतःला बगल देणं सुरू असतं, हेच वाक्य जर मी कुठे चुकतोय का? माझ्या कृती कुणाला त्रास देत आहेत का? अशा प्रकारे विचारले गेले, तर त्यातून आत्मप्रबोधनाची प्रक्रिया सुरू होईल आणि खरी जबाबदारी स्वीकारण्याची तयारी होईल; आयुष्यात आपण जे काही करतो ते आपल्या दृष्टिकोनातून योग्य वाटतं, पण दुसऱ्याच्या दृष्टीने ते चुकीचं असू शकतं आणि त्यातून निर्माण होणारी भावना ही खूप खोलवर जखम देऊ शकते, म्हणूनच आपल्या कृती, शब्द आणि निर्णय यांचा परीघ फक्त आपणच नव्हे, तर इतरांचं भावविश्वही असतं हे ध्यानात ठेवणं गरजेचं आहे आणि यासाठी आत्मचिंतनाची आवश्यकता आहे, तेवढं केलंत तर माझं काय चुकलं? हा प्रश्नच निर्माण होणार नाही, कारण त्याचं उत्तर आधीच सापडलेलं असेल, आणि जर सापडलं नसेल तर तुमचं मन त्यासाठी कधीच थांबणार नाही, ते तुम्हाला दररोज, दर क्षणी हलवून हलवून विचारत राहील की खरंच तुझं काहीच चुकलं नव्हतं का? आणि मग तो प्रश्न देवाकडे नेण्यापेक्षा तुमचं स्वतःचं मनच तुमचं सर्वात कठोर आणि सर्वात निष्ठावान दार्शनिक ठरेल, जो तुम्हाला तुमच्याशी भिडायला लावेल, तुमच्या प्रत्येक कृतीचं विश्लेषण करायला लावेल आणि जर हे विश्लेषण प्रामाणिक असेल, तर त्यातून निघणाऱ्या निष्कर्षामध्येच समाधान, शांती आणि आत्मस्वीकृती मिळेल, हेच खरं जीवनसत्त्व, हेच खरं अध्यात्म.

---

**- प्राचार्य डॉ बालाजी रंगनाथराव लाहोरकर,**
श्रीमती सिंधुताई जाधव महाविद्यालय, मेहकर, जिल्हा बुलढाणा, मोबाईल ९८८१३६१४६९

# रमेशआप्पा, रेणापूरची चिंता करू नका; विशेष लक्ष देवू ग्रामीण मतदार संघाची सेवा हीच स्व.मुंडे साहेबांची सेवा स्व. गोपीनाथरावजी मुंडे साहेबांच्या पुतळा अनावरण कार्यक्रमात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस







लातूर :– नेतृत्व, वकृत्व आणि कर्तुत्व असलेल्या लोकनेते गोपीनाथरावजी मुंडे साहेबांकडे निर्णय क्षमता, हिम्मत आणि क्षमता होती. त्यांनी माझ्यासारख्या असंख्य कार्यकर्त्यांना घडविले असून मुंडे साहेबांनी पाहिलेल स्वप्न पूर्ण करण्यासाठी आमचे प्रयत्न असून मुंडे साहेबांनी अनेकवर्ष रेणापूरचे नेतृत्व केले आहे. रमेशआप्पा तुम्ही रेणापूरची चिंता करू नका, तुमच्या मतदार संघाची सेवा केली तर मुंडे साहेबाची सेवा केल्याप्रमाणे आहे त्यामुळे या लातूर ग्रामीण मतदार संघाकडे माझे विशेष लक्ष असेल असे राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांनी बोलून दाखविले.

लातूर येथील जिल्हा परिषद प्रांगणात १४ फुट उंचीचा ९०० किलो वजनाचा अत्यंत आकर्षक आणि भव्य दिव्य उभारण्यात आलेल्या लोकनेते गोपीनाथरावजी मुंडे साहेब यांच्या पूर्णकृती पुतळ्याचे अनावरण मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांच्या शुभहस्ते सोमवारी एका शानदार कार्यक्रमातून झाले. अनावरण सोहळ्याचा मुख्य कार्यक्रम दयानंद महाविद्यालयाच्या मैदानावर झाला. यावेळी हजारो साजन समुदाय उपस्थित होता. भाजपा नेते आ रमेशआप्पा कराड यांनी अत्यंत देखणे नियोजन केलेल्या या सोहळ्यास राज्याचे सार्वजनिक बांधकाम तथा जिल्ह्याचे पालकमंत्री शिवेंद्रसिंह राजे भोसले, ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे, पर्यावरण तथा पशुसंवर्धन विकास मंत्री पंकजाताई मुंडे, माजी कृषिमंत्री आ धनंजय मुंडे, जिल्ह्याचे माजी पालकमंत्री आ संभाजीराव पाटील माजी मंत्री आ. संजय बनसोडे, राज्य कृषी मूल्य आयोगाचे अध्यक्ष पाशा पटेल, आ संजय केनेकर, आ. अभिमन्यू पवार, आ विक्रम काळे, ऊसतोड कामगार महामंडळाचे अध्यक्ष गोविंद केंद्रे, मराठवाडा संघटन मंत्री संजय कौडगे, बस्वराज पाटील, बळवंतराव जाधव, अरविंद पाटील, शिवाजीराव कव्हेकर, अर्चनाताई पाटील चाकूरकर, मकरंद सावे, व्यंकट बेंद्रे, दिलीपराव देशमुख, सचिन दाणे, अजित पाटील, प्रेरणा होनराव राहुल केंद्रे, विक्रमकाका शिंदे, ऋषिकेश कराड, भागवत सोट, नवनाथ भोसले, त्र्यंबकआबा गुट्टे, रामचंद्र तिरुके, संजय दोरवे, अशोक केंद्रे, अनिल भिसे, सतिष आंबेकर, भारतबाई साळूंके, संगिता घुले, ज्योती राठोड, रागिनी यादव, सुभाष जाधव, अमोल निडवदे, हणमंत नागटिळक, चंद्रशेखर सोनवणे, बाबासाहेब कांबळे, भिमाशंकर राठोड यांच्यासह जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर, जिपचे मुख्य कार्यकारी अधिकारी राहूलकुमार मीना, मनपा आयुक्त मानसी मीना व अनेक मान्यवरांची व्यासपीठावर प्रमुख उपस्थिती होती. या सोहळ्यास लातूर जिल्ह्यासह आजूबाजूच्या परिसरातून भाजपासह महायूतीचे लोकप्रतिनिधी, पदाधिकारी, कार्यकर्ते मुंडे साहेबावर प्रेम करणारे हजारो जणांचा जनसमुदाय उपस्थित होता. महिलांची संख्या लक्षणीय होती.

यावेळी बोलताना मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस म्हणाले की, गोपीनाथरावजी मुंडे साहेब यांचे जीवन संघर्ष करणारे होते सामान्य कार्यकर्त्यापासून मोठमोठ्या पदापर्यंत त्यांची वाटचाल मेहनतीतून आणि संघर्षातून झाली. आज महाराष्ट्रात भाजपा एक नंबरचा पक्ष आहे. पक्षाच्या विस्तारात मुंडे साहेबांचा मोठा वाटा असून वेगवेगळ्या यात्रेच्या माध्यमातून समाजातील सर्व घटकाच्या न्याय हक्कासाठी विविध यात्रेच्या माध्यमातून मोठा संघर्ष केला. विरोधी पक्ष नेता कसा असावा याचा आदर्श मुंडे साहेबांनी घालून दिला. राजकारणातील गुन्हेगारी विरुद्ध आवाज उठवला, अनेक घोटाळे बाहेर काढले, दाऊदला आव्हान दिले. ज्या पद्धतीने मुघलांना संताजी धनाजी दिसायचे तशी अवस्था तेव्हाच्या सत्ताधाऱ्यांनी केली होती रात्री झोपेतही मुंडेच त्यांना दिसत होते. १९९५ च्या त्यांनी काढलेल्या संघर्ष यात्रेने महाराष्ट्रात परिवर्तन घडले आणि महायुतीचे सरकार सत्तेवर आले.

महायुतीच्या सरकारमध्ये उपमुख्यमंत्री आणि गृहमंत्री पदाची जबाबदारी सांभाळून मुंडे साहेबांनी गुंडाराज बंद करण्यासाठी मोकोका कायदा तयार केला गोळीने गोळीचे उत्तर चालू केले आणि गुंडराज विळख्यातून महाराष्ट्राला बाहेर काढले याचा मला अभिमान आहे असे सांगून फडणवीस म्हणाले की, आयुष्यात कधीच त्यांनी संघर्ष सोडला नाही. नंतरच्या काळात सत्ता नसतानाही जनतेची साथ आणि मोठे समर्थन असल्याने मुंडे साहेबांचा रुबाब कायम होता. केंद्रातही त्यांचे नेतृत्व विकसित झाले. केंद्रीयमंत्री म्हणून त्यांना खूप कमी काळ मिळाला हे आपले दुर्दैव आहे. अधिक काळ मिळाला असता तर चमकता तारा देशाचा नेता म्हणून आपण पाहू शकलो असतो असेही त्यांनी बोलून दाखविले.

मला जे काही यश मिळाले ते केवळ गोपीनाथरावजींच्या शिकवणी मुळेच मिळाले, सत्ता अनेक अमिषे दाखवते. सत्तेशी संघर्ष करायला शिक, समझोता करू नको त्यातून संपत्ती वाढेल पण नेतृत्व कमजोर होईल मुंडे साहेबांचा हा सल्ला कायम स्मरणात ठेवून काम करत असल्याचे सांगून देवेंद्रजी फडणवीस म्हणाले की, छोट्या छोट्या समाजाने एकत्र आले तर नेतृत्व मिळेल, सामान्य माणसाला स्वप्न पाहण्याचा अधिकार आहे याची जाणीव करून दिल्याने आज वंचित समाजातील अनेकजण विविध ठिकाणी नेतृत्व करत आहेत. सामाजिक न्यायाची कधीच त्यांनी कास सोडली नाही यामुळे अनेकवेळा मुंडे साहेबांना परिणाम भोगावे लागले मात्र विचारावर कायम राहिले. एका समाजाच्या कल्याणसाठी दुसऱ्या समाजाचा द्वेष करू नये अशी भावना त्यांनी जीवनभर बाळगली होती. मुंडे साहेबांनी ओबीसीची मोट बांधली तरीही इतर समाजांचे त्यांच्यावर मोठे प्रेम होते हे आजच्या राजकारण्यांनी मुंडे साहेबांकडून शिकले पाहिजे.

मुंडे साहेबांना मुख्यमंत्री म्हणून पाहण्याचे आमचे स्वप्न अपुरे राहिले असल्याचे सांगून मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, मराठवाड्याला हक्काचे पाणी मिळावे यासाठी त्यांनी संघर्ष केला. गोदावरी परिक्रमा करून मराठवाडा दुष्काळमुक्त करण्याचे त्यांचे स्वप्न होते. येत्या काळात मराठवाड्याच्या हक्काचे ५४ टीएमसी पाणी आणून मराठवाड्याला दुष्काळ मुक्त करण्याचे मुंडे साहेबांचे स्वप्न आम्ही निश्चितपणे पूर्ण करू अशी ग्वाही दिली. परळी बीड नगर रेल्वे काम अंतिम टप्प्यात असून लातूरच्या रेल्वे कोच प्रकल्पातून पुढच्या वर्षी जेव्हा उत्पादन सुरू होईल तेव्हा दहा हजार जणांना रोजगार मिळणार आहे हा रोजगार स्थानिकांनाच मिळाला पाहिजे असे संबंधितांना ठणकावून सांगितले असल्याची माहिती त्यांनी दिली.

गोपीनाथजी मुंडे आणि विलासरावजी देशमुख यांची मैत्री संपूर्ण महाराष्ट्राला माहीत होती. दोन्ही मित्र स्मारकाच्या स्वरूपात लातूर जिल्हा परिषदेच्या प्रांगणात आजूबाजूला आले हाही योगायोग असल्याचे यावेळी बोलताना मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांनी सांगितले.ना. शिवेंद्रसिंह राजे भोसले

स्व. गोपीनाथरावजी मुंडे यांच्या पूर्णाकृती पुतळा अनावरणप्रसंगी आठवणींना उजाळा देताना पालकमंत्री शिवेंद्रसिंह राजे भोसले म्हणाले की, मी पहिल्यांदा आमदार झालो, त्यावेळी विधानभवानात स्व. गोपीनाथरावजी मुंडे यांचे आगमन झाले. एक वेगळेच वातावरण निर्माण होत असे. त्यांच्या भाषणाचा मी देखील मोठा फॅन होतो, त्यांची वेगळी शैली होती. गोपीनाथरावजी मुंडे यांनी अन्यायाविरोधात संघर्ष करून न्याय सर्वसामान्यांना मिळवून दिला. त्यामुळेच त्यांना लोकनेते, संघर्षयोद्धा म्हणून ओळखले जात होते. त्यांच्या नेतृत्त्वाखालीच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस घडले आणि आमचे भाग्य आहे की आम्ही आता देवेंद्रजी फडणवीस यांच्या नेतृत्त्वामध्ये काम करीत आहोत. देवेंद्र फडणवीस यांच्या राजकीय खेळीने झोपलेले तर जागे झालेच पण त्यांना राजकारणातूनही आडवे करण्याचे काम केले असल्याचे त्यांनी सांगितले ना. पंकजाताई मुंडे

ग्रामीण विकास व पंचायत राज विभागाचे मंत्री म्हणून काम करत असताना स्व. गोपीनाथराव मुंडे यांनी अखेरचा श्वास घेतला. त्याच विभागाच्या लातूर जिल्हा परिषदेच्या प्रांगणात पुतळा उभा राहिला आणि या पुतळ्याचे अनावरण देवेंद्रजींच्या हस्ते व्हावे अशीच साहेबांची इच्छा असावी असे सांगून यावेळी बोलताना पर्यावरण मंत्री पंकजाताई मुंडे म्हणाल्या की, मुंडे साहेबांना आपल्यातून जावून आज ११ वर्ष झाली आहेत. त्यांच्यावर प्रेम करणारे लोक आजही मोठ्या संख्येने आहेत. माझी झोळी कमी पडेल एवढे जनतेने मला प्रेम दिले आहे. या प्रेमापुढे पद, प्रतिष्ठा, पैसा काहीच नाही. स्वर्गातील माझ्या बापाची मान खाली जाणार नाही अशी कृती कधीच माझ्या हातून होणार नाही. त्यांचे जीवन हे संघर्षमय होते, कितीही संकटे आली तरी स्वाभिमान गहाण टाकायचा नाही, ही त्यांची शिकवण होती. गणित कधीही बेरजेचे करावे हे सूत्र देवेंद्रजींनी तंतोतंत अनुकरण केले असल्याचे सांगत रमेशआप्पा तुम्ही रेणापूरचे आमदार झालात, मी परळीची आमदार झाले पण रेणापूरकरांनी दिलेले प्रेम मी कधीही विसरू शकत नाही. मुंडे साहेबांनी दाखविलेल्या मार्गावरच माझी वाटचाल सुरु असून मी कधीही थकणार नाही कुणापुढे झुकणार नाही मातणार नाही आणि घेतला वसा कधीच टाकणार नाही असल्याचे पर्यावरणमंत्री पंकजा मुंडे यांनी सांगितले. ना. जयकुमार गोरे

ग्रामविकास व पंचायत राज मंत्री जयकुमार गोरे म्हणाले, स्व. गोपीनाथराव मुंडे यांच्या संघर्षाचे व कार्याचे आम्ही साक्षीदार आहोत. त्यांच्या स्वप्नातील महाराष्ट्र मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांच्या नेतृत्वात घडत आहे. प्रधानमंत्री आवास योजनेचे उद्दिष्ट वाढवून आणून ३० लाख कुटुंबांना घरकुल देण्याचे काम करण्यात येत असल्याचे त्यांनी सांगितले. आ. धनंजय मुंडे

संघर्ष हा मुंडे कुटुंबाला कायम पाचवीला पुजलेला आहे असे सांगून धनंजय मुंडे म्हणाले की, केवळ सामान्य माणसाला न्याय मिळाला पाहिजे एवढ्याच साठी मुंडे साहेबांनी संघर्ष उभा केला. म्हणूनच त्यांना संघर्षयोद्धा म्हणलं जातंय. या संघर्षाच्या काळात मी सावली सारखा होतो. मुंडे साहेब मुख्यमंत्री व्हावेत ही आपल्या सर्वांची अपेक्षा होती मात्र ती अपूर्णच राहून गेली. देवेंद्रजी मुख्यमंत्री व्हावेत हे मुंडे साहेबांचे स्वप्न प्रत्यक्षात उतरले असून सामान्यांच्या विकासासाठी, न्याय हक्कासाठी मुंडे साहेबांचा हा वारसा अनेकांना आहे. घेतलेला हा वारसा कायमपणे टिकून ठेवून पुढे चालवावा असे माजी कृषिमंत्री आ धनंजय मुंडे यांनी बोलून दाखविले. आ. रमेशअप्पा कराड

महाराष्ट्रातील पहिला शासकीय जागेतील लोकनेते गोपीनाथरावजी मुंडे साहेबांचा पूर्णाकृती पुतळा बसवण्याचा मान लातूरला मिळाला याचा सार्थ अभिमान असल्याचे सांगून यावेळी बोलताना भाजपानेते आ. रमेशआप्पा कराड म्हणाले की, विकासापासून कोसो दूर असणाऱ्या समाजाला आणि वंचित घटकाला विकासाच्या प्रवाहात आणण्यासाठी मुंडे साहेबांनी संपूर्ण आयुष्य खर्ची घातले. राज्यातील नव्वद टक्के कार्यकर्ते मुंडे साहेबांच्या तालमीत आणि संस्कारात तयार झालेले आहेत त्यांनी अनेकांना विविध पदे दिले कार्यकर्त्याला नेता होण्याचा मान दिला. देशात नरेंद्र आणि राज्यात देवेंद्र ही घोषणा मुंडे साहेबांनी दिलेली आजही अनेकांना आठवते आज महाराष्ट्रात देवेंद्रजींच्या नेतृत्वात विकासाची घोडदौर सुरू आहे. त्यांनी तयार केलेला कार्यकर्ता महाराष्ट्राला विकासाच्या उंचीवर घेऊन जाण्याचे काम करीत आहेत. हे पाहण्यासाठी मुंडे साहेब आज असायला हवे होते मात्र नक्कीच स्वर्गात सुद्धा ते आनंदी आणि समाधानी असतील. देवेंद्रजींनी भल्या भल्यांची झोप उडवून टाकली त्यांचे काम इतरांनी आदर्श घेण्यासारखे आहे मुंडे साहेबांचे अधुरे स्वप्न देवेंद्रजींच्या हातून पूर्ण व्हावे हीच आम्हा सर्वांची इच्छा आहे.

मुंडे साहेबांनी ज्या रेणापूर भागाचे नेतृत्व केले त्या तालुक्याचा सेवक म्हणून काम करण्याची संधी देवेंद्रजीमुळे मला मिळाली हे माझे भाग्य समजतो. लातूर ग्रामीण मतदार संघातील जनतेने जे अशक्य होते ते शक्य करून दाखविले. या मतदार संघात विजय मिळविणे म्हणजे पाकिस्तानात जाऊन भारताचा झेंडा फडकविण्यासारखे आहे असे सांगून आ रमेशआप्पा कराड म्हणाले की, रेणापूर येथे एमआयडीसी विकसित करावी, पोलीस वसाहतीसह शासकीय इमारतीची दयनीय अवस्था झाल्याने नव्याने मंजूर कराव्यात, मुरुडला तालुक्याचा दर्जा द्यावा, नगरपालिका मंजूर करावी यासह लातूर ग्रामीण मतदार संघातील ग्रामीण रस्ते, आरोग्य केंद्र, सिंचन प्रकल्प व इतर अडीअडचणी, दुःख आणि प्रश्नांची सोडूवणूक करण्याची जबाबदारी तुमच्या माध्यमातून व्हावी हीच इच्छा आहे. मुंडे साहेबांचा हा पुतळा केवळ मूर्ती नसून या स्मारकाद्वारे नव्या पिढीला प्रेरणेची ऊर्जा मिळणार आहे त्यामुळे येत्या काळात एक ऊर्जा केंद्र म्हणून विकसित करण्याचा प्रयत्न राहील असेही शेवटी आ. रमेशअप्पा कराड यांनी बोलून दाखवले.

शेवटी भाजपाचे जिल्हाध्यक्ष बसवराज पाटील यांनी आभार मानले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन उद्धव फड, चंद्रकांत कातळे आणि शैलेश गोजमुंडे यांनी केले. पुतळा अनावरण निमित्ताने लातूर शहरात जागोजागी मोठे बॅनर, आकर्षक कमानी उभारण्यात आल्या होत्या. कार्यक्रमाच्या ठिकाणी उपस्थित असलेल्या जनसमुदायास जिल्हा परिषद प्रांगणातील अनावरण सोहळा पाहता यावा यासाठी थेट प्रक्षेपण करण्यात आले होते. एकुणच मोठया उत्साहाच्या वातावरणात अनावरण सोहळा पार पडला. या सोहळयास हजारोंचा जनसमूदाय उपस्थित होता.

# तिरू प्रकल्पावरील उजवा व डाव्या कालव्यासाठी निधी उपलब्ध करुन देण्याचे जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांचे आश्वासन

### माजी मंत्री आमदार संजय बनसोडे यांच्या मागणीला लवकरच यश येणार




उदगीर : जगाचा पोशिंदा असलेल्या शेतकऱ्यांना न्याय मिळवून देण्यासाठी माजी क्रीडा मंत्री तथा उदगीर मतदारसंघाचे आमदार संजय बनसोडे हे सतत प्रयत्नशील असतात. मतदारसंघामध्ये असलेल्या तिरू मध्यम प्रकल्पाच्या उजव्या व डाव्या या दोन्ही कालव्यांची अवस्था खराब झाल्याचे आ.संजय बनसोडे यांच्या लक्षात येताच शेतकऱ्यांना सिंचनासाठी पाणी देण्यासाठी कालवा बांधकाम दुरूस्ती व कालवा अस्तरीकरण करणे आवश्यक असुन यासाठी निधी उपलब्ध करुन द्यावा अशी मागणी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे व राज्याचे जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्याकडे माजी क्रीडामंत्री आ.संजय बनसोडे यांनी केली होती. त्या अनुषगांने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जलसंपदा मंत्र्याना सुचना दिली होती. त्या अनुषंगाने आज मुंबईत राधाकृष्ण विखे पाटील यांनी जलसंपदा विभागाची विशेष बैठक घेवुन तिरु मध्यम प्रकल्पाचे बांधकाम हे १९७६ साली झाले असुन मागील ५० वर्षामध्ये हा तलाव ३१ वेळा पूर्णपणे भरला आहे. धरणाचे सिंचन क्षेत्र २३४८ हेक्टर असुन तलावास उजवा व डावा कालवा असे दोन कालवे आहेत. त्याची दुरुस्ती केली तर याचा फायदा या भागातील शेतकऱ्यांना मोठ्या प्रमाणात होणार असून यासाठी लागणारा कोट्यावधी रुपयाचा खर्च अपेक्षित असुन या प्रकल्पाला आपण लवकरच तत्वत: मान्यता देण्याचे आश्वासन जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी बैठकीत दिले आहे. उदगीर – जळकोट मतदार संघातील शेतकरी हा सुखी व समृध्द झाला पाहिजे. आपल्या भागातील शेवटच्या माणसा पर्यंत पाणी पोहचले पाहिजे आणि मतदार संघातील प्रत्येक शेतकरी हा संपन्न झाला पाहिजे यासाठी माजी मंत्री व उदगीर – जळकोट मतदार संघाचे आमदार संजय बनसोडे हे सतत प्रयत्नशील असतात. त्यांच्या मागणीची दखल घेवुन जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी तिरु नदीवरील कालच्या संदर्भात बैठक घेवुन सकारात्मक प्रतिसाद दिला असुन लवकरच निधी देवु असे सांगितले आहे. यावेळी जलसंपदा विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

# व्ही एस पँथर्स च्या वतीने डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या ७५ फुटी पुतळा उभारणी आणि लातूर जिल्हा रुग्णालय संदर्भाने मुख्यमंत्र्यांना दिले निवेदन



लातूर : व्ही एस पँथर्स युवा संघटनेचे सं अध्यक्ष विनोदभाऊ खटके यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना लातूर शहरातील डॉ बाबासाहेब आंबेडकर पार्क येथील डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या ७५ फुटी पुतळा उभारणी चे काम तात्काळ सुरू करण्यात यावे तसेच लातूर जिल्हा रुग्णालयाचे बांधकाम तात्काळ सुरू करण्यात यावे आणि लातूर जिल्ह्यातील( खाजगी अनुदानित )काही प्रसिध्द शिक्षण संस्थेमध्ये चुकीच्या पद्धतीने शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी भरती करण्यात आली आहे ती रद्द करून पवित्र पोर्टल मार्फत नव्याने कर्मचाऱ्यांची भरती करण्यात यावी अशी मागणी करण्यात आली यावेळी सं अध्यक्ष विनोद भाऊ खटके, मार्गदर्शक संतोष मांदळे ,रवि कुरील, जिल्हाध्यक्ष शरद किणीकर, विद्यार्थी आघाडी जिल्हाध्यक्ष स्वप्नील कांबळे , पंकज शिंदे, गिरीश पवार सह आदीजन उपस्थित होते ..

# पानगाव सोसायटीच्या नवनिर्वाचित भाजपा संचालकाचे भाजपा नेते आ. रमेशआप्पा कराड यांच्याकडून अभिनंदन

लातूर :– रेणापूर तालुक्यातील मौजे पानगाव येथील सेवा सहकारी सोसायटीच्या निवडणुकीत घवघवीत यश संपादन केलेल्या भाजपाच्या नवनिर्वाचित सर्व नऊ संचालकांचे भाजपाचे नेते लातूर ग्रामीणचे आमदार श्री. रमेशआप्पा कराड यांनी सत्कार करून अभिनंदन केले व पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या.

पानगाव सेवा सहकारी सोसायटीच्या निवडणुकीत भाजपाच्या नेतृत्वातील पॅनलने दणदणीत विजय प्राप्त केला आहे. भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांनी लातूर येथील भाजपाच्या संवाद कार्यालयात मंगळवारी दुपारी पानगाव सोसायटीचे नवनिर्वाचित संचालक विद्यमान चेअरमन गणेश वांगे, धर्मराज बरुळे, शेषेराव हानवते, अविनाश मोटाडे, मुरलीधर डोने, ज्ञानेश्वर संपत्ते, सुधाकर फुले, दीपक पेदे, किशोर हरिदास यांचा सत्कार करून अभिनंदन केले व पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या.

यावेळी बोलताना आ. कराड म्हणाले की, स्वर्गीय मुंडे साहेबांनी रेणापूर, पानगाव भागाचे नेतृत्व केले आता या भागाची सेवा करण्याची मला संधी मिळाली हे माझे भाग्य असून या भागासाठी जे जे करणे शक्य आहे ते करण्याचा माझा प्रयत्न असून महिनाभरात पानगावच्या ग्रामीण रुग्णालयास मंजुरी मिळेल, पानगाव पोलीस स्टेशनचा प्रस्ताव शासन दरबारी आहे त्यासही लवकरच मंजुरी मिळेल असे सांगून तुमच्या मनातील विकासाच्या संकल्पना निश्चितपणे पूर्ण करणार असल्याचे बोलून दाखवले.

शेतकऱ्यांना सोसायटीच्या माध्यमातून मदत करावी अशी सूचना करून आ. रमेशआप्पा कराड यांनी जिल्हा बँकेने जाहीर केल्याप्रमाणे किती जणांना बिनव्याजी पाच लाखाचे कर्ज मिळाले असा प्रश्न उपस्थित केला. खोटी आश्वासने देऊन वर्षानुवर्ष सत्ता उपभोगणाऱ्या काँग्रेसवाल्यांना प्रत्येक निवडणुकीत त्यांना त्यांची जागा दाखवून दिली पाहिजे. जनतेनी पानगावातील काँग्रेसच्या पुढार्यांना घरी बसवले. जनतेतून संपलेले पुढारी बाहेर येणार नाहीत याची सर्वांनी काळजी घ्यावी असेही त्यांनी बोलून दाखविले.

प्रारंभी ज्येष्ठ नागरिक दत्ता कुलकर्णी आणि गोपाळ शेंडगे यांनी निवडून आलेला हा पॅनल भाजपचाच आहे काहींनी जाणीवपूर्वक सोशल मीडियातून श्रेय घेण्याचा प्रयत्न केला असला तरी त्यात कसलेही तथ्य नाही असे सांगून पानगावच्या विकासासाठी आमदार साहेबांनी लक्ष घालावे असे बोलून दाखवले.

सोसायटीचे चेअरमन गणेश वांगे यांनी यावेळी भारतीय जनता पार्टीत जाहीर प्रवेश केला. प्रारंभी ज्येष्ठ नागरिकासह भाजपा पदाधिकाऱ्यांनी आ. रमेशआप्पा कराड यांचा यथोचित सत्कार केला. शेवटी ईश्वर गुडे यांनी आभार मानले कार्यक्रमाचे सूत्रसंचालन चंद्रकांत कातळे यांनी केले. यावेळी भाजपाचे शहराध्यक्ष गणेश तुरुप यांच्यासह श्रीराम हरिदास, ज्ञानोबा फुले, दत्ता कस्तुरे, बाबुराव भंडारे, बाबुराव हरिदास, दिलीपराव शेंडगे, शिवलिंगआप्पा हलकुडे, दत्ता डोने, धोंडीराम हलकुडे, शिवाजी शेंडगे, बसवेश्वर स्वामी, रामेश्वर हलकुडे, कचरू उकरले, सतीश कुलकर्णी, मारुती गालफाडे, रमाकांत संपत्ते, गोविंद दुट्टे, आरूप कुलकर्णी, अविनाश मोटाडे, दिनेश भंडारे, बालाजी मुचे, गुंडेराव तुरूप, वामनराव संपत्ते, लक्ष्मण कावडे, शेषेराव कुलकर्णी, सतीश कुलकर्णी, अभिमान संपत्ते, सचिन भंडारे, भारत संपते, वासोकोदिन सिद्दिकी, दत्तात्रय भंडारे, सतीश फुलारी, नादरखॉ पठाण, राजेश पाठक यांच्यासह अनेक जण होते.

# मा. वरिष्ठ बौद्धाचार्य : राहुल जावळे गुरुजी यांनी बौद्धाचार्य : कल्याणराव हनवते यांचे केले अभिनंदन





ज्वेल ऑफ नवी मुंबई – लॉर्ड बुद्धा पार्क या ठिकाणी सुंदर अशा श्रावण पौर्णिमेच्या कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन केल्याबद्दल बौद्धाचार्य : कल्याणराव हनवते यांचे मी राहुल जावळे मन:पूर्वक अभिनंदन करतो. खरं तर, हा केवळ एक धार्मिक कार्यक्रम नव्हता, तर समाजाला एकत्र आणणारा, शांततेचा संदेश देणारा आणि एक नवी क्रांती घडवणारा महत्त्वाचा टप्पा होता. बौद्धाचार्य हनवते यांनी घेतलेल्या अथक प्रयत्नांमुळेच हे शक्य झालं आहे. त्यांच्या दूरदृष्टीमुळे आणि कठोर परिश्रमामुळेच आज आपण सर्वजण या कार्यक्रमात सहभागी होऊ शकलो. त्यांचे हे काम केवळ कौतुकास्पद नाही, तर प्रेरणादायी आहे. समाजात एकता आणि शांतता प्रस्थापित करण्याची त्यांची तळमळ या कार्यक्रमातून स्पष्ट दिसते. या यशस्वी आयोजनाबद्दल पुन्हा एकदा बौद्धाचार्य कल्याणराव हनवते आणि त्यांच्या सर्व सहकाऱ्यांचे मी मनापासून आभार मानतो.

## सोमय्यांच्या बाबतीत लातूर काँग्रेसने लेखी निवेदन देऊन विचारला मनपा प्रशासनास जाब



लातूर:– माजी खासदार किरीट सोमय्या यांनी कोणत्याही अधिकृत पदावर नसताना लातूर महानगरपालिकेत अधिकाऱ्यांची बैठक घेतल्याने नवा वाद निर्माण झाला आहे. या प्रकरणी लातूर शहर जिल्हा काँग्रेस कमिटीने महानगरपालिका आयुक्त मानसी मीना यांच्याकडे लेखी निवेदन सादर करून सोमय्या यांनी कोणत्या अधिकारात महानगरपालिका प्रशासनाची बैठक घेतली, एका ठ्ठ्ख कार्यकर्त्यांचे स्वागत महानगरपालिका प्रशासनाने कशा साठी केले या बाबतीत प्रशासनास जाब विचारला. भाजपचे माजी खासदार किरीट सोमय्या यांनी (शुक्रवार) दि.०८ ऑगस्ट २०२५ रोजी लातूर महानगरपालिकेत प्रशासकीय अधिकाऱ्यांची बैठक घेतली होती. संविधानानुसार,कोणत्याही अधिकृत पदावर नसलेल्या व्यक्तीला ठ्ठ्ख कार्यकर्ता म्हणून प्रशासकीय कामकाजात हस्तक्षेप करण्याचा अधिकार नाही.त्यामुळे ही कृती शासकीय कामकाजात अनावश्यक हस्तक्षेप असून प्रशासकीय कार्यालयाचा अवमान करणारी असल्याचे काँग्रेसने म्हटले आहे. या बैठकीत किरीट सोमय्या यांनी विशिष्ट समाजाला 'बांगलादेशी' संबोधून त्यांच्या विरोधात कार्यवाही करण्याचे निर्देश दिल्याचे आरोपही या निवेदनात करण्यात आलेले आहेत. अशा प्रकारची वक्तव्ये समाजात तेढ निर्माण करणारी आणि द्वेष पसरवणारी आहेत असे म्हणत यामुळे केवळ प्रशासनाचाच नव्हे,तर संविधानाने दिलेल्या समानतेच्या अधिकाराचाही अपमान झाल्याचा आरोप देखील करण्यात आला आहे. या वेळी लातुर शहरात जन्म नोंदणी प्रमाणपत्राच्या प्रक्रियेत नागरिकांना येत असलेल्या अडचणींवर लक्ष वेधण्यात आले आहे

# नेरूळ येथील सुश्रुषा रुग्णालयाला लागली आग

## अग्निक्षमन दलाच्या चार गाड्या घटनास्थळी दाखल मोठा पेठ घेण्याआधीच आग आणली नियंत्रणात

नवी मुंबई / के. एच. हनवते :– नेरूळ सेक्टर ६ येथील असलेल्या सुश्रुषा रुग्णालयात सोमवारी दुपारी १२ च्या दरम्यान आग लागल्याची घटना घडली बेसमेंट मध्ये असलेल्या सर्वर रूमला आग लागल्याचे प्रत्यक्षदर्शनी सांगितले, हा हा म्हणताच तीन मजल्यापर्यंत आगीने पेट घेतला होता जिकडे तिकडे धूरच दुर पसरला होता जनतेचे धावफळ झाली, यावेळी एकूण या हॉस्पिटलमध्ये २१ रुग्ण उपचार घेत होते ४ आयसीयू कक्षामध्ये उपचार होते या सर्वांना तातडीने इतरत्र रुग्णालयात शिफ्ट करण्यात यश आले असल्याने पुढील अनर्थ टाळला, रुग्णालयाचे काही प्रमाणात नुकसान झाले आहे पण हे मुळातच रुग्णालय दाटीवाटीने वसलेले आहे, सुरक्षेच्या दृष्टीने येथे उपाययोजना बरोबर नसल्याचे दिसून आले, पालिकेने देखील या रुग्णालयाचे फायर ऑडिट केले होते का ? तसेच पालिकेने परवाना देताना काय तपासून या रुग्णायाला परवाना दिला ? असे अनेकविध प्रश्न उपस्थित केले जात आहेत त्यामुळे पालिका अधिकाऱ्यांच्या कार्यक्षमतेवर व हेतूवर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहेत रुग्णालयात कोणतेही नियम पाळले गेलेले नाहीत दाटी वाटीने हे रुग्णालय सुरू आहे येथे गाडी पार्किंगची पण



व्यवस्था नाही, हमेशा य – जा गाड्यांचे ट्राफिक होत असते मी चंद्रकांत कांबळे घटनास्थळी वेळेत उपस्थित राहून स्वतः हा रुग्णांना बाहेर काढत होतो, एकीकडे पुनर्विकस परवानग्या देताना पालिका नियमावर बोट ठेवून सोसायट्यांना जेरीस आणते इथे मात्र नियम पायदळी तुडवून बिनदिक्कत परवानग्या कशा दिल्या जातात ? यातून कोणी स्वतःचे भले करून घेतले आहे का ? याची चौकशी व्हावी..! असे घटनास्थळी वेळीच उपस्थित राहून : चंद्रकांत कांबळे उपशहर प्रमुख शिवसेना शिंदे गट यांनी आपली प्रतिक्रिया दिली.

# महाराष्ट्र पोलीस दलात १५ हजार पदभरती लेखी परीक्षेसाठी ओएमआर प्रणालीचा वापर

मुंबई :– महाराष्ट्र पोलीस दलातील शिपायांची सुमारे १५ हजार पदे भरण्यात येणार आहेत. त्याकरिता आज सन २०२४–२५ च्या पोलीस शिपाई भरती प्रक्रियेस आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते. या भरतीमध्ये सन २०२२ व सन २०२३ मध्ये संबंधित पदाची विहित वयोमर्यादा ओलांडलेल्या उमेदवारांनाही एक वेळची विशेष बाब म्हणून अर्ज करता येणार आहे व भरती प्रक्रियेत सहभागी होता येणार आहे. राज्याच्या पोलीस दलात सन २०२४ दरम्यान रिक्त असलेली व २०२५ मध्ये रिक्त होणाऱ्या पदांचा आढावा घेऊन, ही भरती करण्यात येणार आहेत. भरण्यात येणारी पदांची संख्या अशी, पोलीस शिपाई – १२ हजार ३९९, पोलीस शिपाई चालक – २३४, बॅण्डस् मॅन – २५, सशस्त्र पोलीस शिपाई – २ हजार ३९३, कारागृह शिपाई – ५८०. एकूण १५ हजार, ६३१. पोलीस शिपाई व कारागृह शिपाई ही पदे गट – क संवर्गातील आहेत. पोलीस शिपाई भरती प्रक्रिया त्या–त्या जिल्हा स्तरावरून राबविण्यात येते. त्यासाठी ओएमआर आधारित लेखी परीक्षा घेण्यात येईल.



Translated with Google Lens

भरतीसाठी अर्ज मागवणे, अर्जाची छाननी, त्यावर प्रक्रिया तसेच उमेदवारांची शारिरीक परीक्षा, त्यातून पात्र उमेदवारांची लेखी परीक्षा यासाठी अनुषांगिक प्रक्रिया राबविण्याचे अधिकार प्रशिक्षण व खास पथके विभागाचे अतिरिक्त पोलीस महासंचालकांना देण्यासही बैठकीत मान्यता देण्यात आली. राज्यातील कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी पोलीस दलातील शिपाई संवर्गाची पदे अत्यंत महत्त्वाची आहेत. पदे रिक्त राहिल्यास, पोलिसांवरील कामाचा ताण वाढतो. पोलीस दल व कारागृहातील स्थिती सुधारण्यासाठी उच्च न्यायालय, सर्वोच्च न्यायालयानेही वेळोवेळी ही पदे वेळेत भरली जावीत असे निर्देश दिले आहेत. लोकप्रतिनिधी, तसेच विधिमंडळातील चर्चेतही लोकप्रतिनिधींकडून ही पदे तातडीने भरण्याची मागणी करण्यात आली आहे.

## महानगरपालिकेत बचत गटाच्या वतीने तिरंगाबाबत झेंडा व विविध वस्तू विक्री केंद्र सुरु शहरातील नागरिकांनी भेट देऊन खरेदी करावी - आयुक्त श्रीमती मानसी

लातूर/प्रतिनिधी :– मनपा आयुक्त श्रीमती मानसी यांच्या आदेशानुसार व अतिरिक्त आयुक्त देविदास जाधव व उपायुक्त डॉ. पंजाब खानासोळे यांच्या मार्गदर्शनाखाली लातूर शहर महानगरपालिका दीनदयाळ अंत्योदय योजना– राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियान अंतर्गत लातूर महानगरपालिकेच्या आवारात सम्यक महिला बचत गट व कुंजन महिला बचत गटांच्या वतीने शहरातील नागरिकांसाठी तिरंगा थीमबाबत झेंडा व इतर विविध वस्तू विक्री केंद्र सुरु करण्यात आले. याचे उद्घाटन आयुक्त श्रीमती मानसी यांचे हस्ते करण्यात आले. आणि सदर महिला बचत गटाचे मनोबल वाढावे म्हणून त्यांनी स्वतः काही वस्तू खरेदी केल्या. यावेळी मनपा उपायुक्त डॉ. पंजाब खानसोळे, मुख्य लेखाधिकारी रावसाहेब कोलगणे, मुख्य स्वच्छता अधिकारी कलीम शेख यांनी सुद्धा याठिकाणी खरेदी करून महिला बचत गटांना प्रोत्साहन दिले. सदर केंद्र दिनांक १३ व १४ ऑगस्ट रोजी सुद्धा विक्रीसाठी चालू राहणार आहे. यावेळी उपस्थित नागरिकांनी सुद्धा त्यांना हव्या असणाऱ्या वस्तूची खरेदी केली. यावेळी जनसंपर्क अधिकारी,रुक्मानंद वडगावे, पवन सुरवसे मनपा अधिकारी आणि कर्मचारी व बहुसंख्य नागरिक उपस्थित होते. सदर केंद्र उभारणीस शहर अभियान व्यवस्थापक लक्ष्मण जाधव, नितीन सुरवसे , समुदाय संघटक वीरेंद्र सातपुते, समूह संसाधन व्यक्ती लोमावती मुळे, नीता भालेकर, ज्योती सोनकांबळे, शामल भालेराव, शीतला गोरे व सम्यक व कुंजन महिला बचत गटाचे अध्यक्ष सचिव व सदस्य यांनी परिश्रम घेतले. तरी शहरातील नागरिकांनी या केंद्रावर येऊन उद्या आणि परवा खरेदी करून महिला बचत गटांना प्रोत्साहन द्यावे असे आवाहन महानगरपालिका आयुक्त श्रीमती मानसी यांनी केले आहे




# ग्रामदैवत श्री सिध्देश्वराची जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर–घुगे यांच्या हस्ते महाआरती







लातूर/प्रतिनिधी :– पवित्र श्रावण महिना सुरू असून या महिन्यात भगवान शंकराची आराधना करण्यात येते. याच पार्श्वभूमीवर श्रावण महिन्यातील तिसजया सोमवारचे औचित्य साधून ग्रामदैवत श्री सिध्देश्वर रत्नेश्वराची महाआरती जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर–घुगे यांच्या हस्ते करण्यातआली. तसेच यावेळी सहधर्मादाय आयुक्त ससाणे यांनीही आपल्या पत्नीसमवेत आरती केली. श्रावण महिना सुरू असून या महिन्यात भगवान शंकराची आराधना अतिशय मनोभावे करण्यात येते. विशेषत: श्रावण महिन्यात सोमवारी अनन्य साधारण महत्व आहे. त्यामुळेच तिसजया सोमवारचे औचित्य साधून लातूरचे ग्रामदैवत असलेल्या श्री सिध्देश्वर व रत्नेश्वर देवस्थानला भेट देवून जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर –घुगे यांच्या हस्ते श्री सिध्देश्वराची महाआरती करण्यात आली. यावेळी सहधर्मादाय आयुक्त ससाणे यांनीही आपल्या पत्नीसमवेत श्री सिध्देश्वराची महाआरती केली. यावेळी देवस्थानचे ज्येष्ठ विश्वस्त विक्रम गोजमगुंडे, प्रशासक सचिन जांबूतकर, अशोक भोसले, महाआरती समितीप्रमुख विशाल झांबरे, तलाठी दत्ता शिंदे, सचिन आलमले, तुकाराम जगताप, अनिकेत जाधव, आकाश सौदागर आदींची उपस्थिती होती. याप्रसंगी देवस्थानच्या वतीने ज्येष्ठ विश्वस्त विक्रम गोजमगुंडे यांनी जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर घुगे यांचा सत्कार केला. यावेळी देवस्थान परिसरात सुरु असलेल्या तिर्थकुंडाच्या कामाची पाहणी जिल्हाधिकारी यांनी करून या कामास निधी कमतरता पडणार नाही, अशी ग्वाही दिली.

## विद्यार्थी जात पडताळणी प्रकरणे निश्चित ठराविक कालमर्यादित निकाली काढण्याची बार्टी महासंचालक डॉ सुनिल वारे यांना संतुजी ब्रिगेडची मागणी

लातूर:– दिनांक १२.०८.२०२५ रोजी डॉ बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था ( बार्टी)पुणे महासंचालक डॉ सुनिल वारे यांची भेट घेत निवेदनाद्वारे अखिल भारतीय संतुजी ब्रिगेडचे संस्थापक अध्यक्ष अँड प्रदिपसिंह गंगणे , महासचिव अँड अमितकुमार कोथमिरे यांनी विद्यार्थी जात पडताळणी प्रकरणे निश्चित ठराविक कालमर्यादेत निकाली काढण्याची मागणी केली आहे. वृत्त सविस्तर – महाराष्ट्रातील ११/१२ वर्गात विज्ञान शाखेत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना व भविष्यात वैद्यकीय,अभियांत्रिकी,औषधनिर्माण शास्त्र,नर्सिंग,एम.बी.ए,एल.एल.बी आदी व्यावसायिक महाविद्यालयात अनुसूचित जाती,जमाती,भटक्या जमाती,ओबीसी,एस.इ.बी सी , एन.टी आदी प्रवर्गाच्या आरक्षणातून प्रवेश घेण्यासाठी वैधता प्रमाणपत्राची आवश्यकता असते .महाराष्ट्रातील विविध जिल्हास्तरीय जात पडताळणी समितीकडे विहित नमुन्यात व मुदतीत विद्यार्थी प्रस्ताव सादर करून ही अनेक प्रस्ताव प्रलबित राहत आहेत त्यामुळे अनेक विद्यार्थी व पालकांना जात पडताळणी कार्यालयाचे उंबरठे झिजवावे लागते यासाठी मानसिक त्रास ही सहन करावा लागतो आहे,विद्यार्थ्यांना पावती आधारे प्रवेशासाठी नोंदणी करता येते पण प्रवेश प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी ठराविक मोजका तीन ते चार दिवसाचाच कालावधी दिला जातो, मुदतीत वैधता प्रमाणपत्र ऑनलाईन सादर न केल्यास अनेक विद्यार्थ्यांना शैक्षणिक नुकसानिस सामोरे जाण्याची भिती आहे. त्यामुळे शैक्षणिक वर्ष २०२६–२७ पासुन विद्यार्थी व पालकांनची गैरसोय होवु नये,कोणाचेही जात वैधता प्रमाणपत्र अभावी शैक्षणिक नुकसान होणार नाही यासाठी विद्यार्थी जात पडताळणी प्रकरणे सी इ टी,नीट, विविध व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या परीक्षेचे निकाल जाहीर होण्यापूर्वीच निश्चित ठराविक कालमर्यादेत जुलै अखेर निकाली काढणे बाबत उचित निर्देश जिल्हास्तरिय जात पडताळणी समित्यांना देण्यात यावेत तसेच अनेक कुटुंब जवळपास ४०/५० वर्ष मुंबई,पुणे,नाशिक व अन्य ठिकाणी पोटापाण्यासाठी स्थलांतरीत झालेले आहेत तर काही महिला कौटुंबीक कलहातून व घटस्फोट झाल्याने माहेरी स्थायिक झाल्याने त्यांच्या तीन/चार पिढ्याचा जन्म,शिक्षण, विवाह आदी झालेले आहेत,त्यांनी किवा त्याच्या पुढील पिढ्यानी शिक्षणासाठी ,घरकुलासाठी,नोकरी आदी कारणासाठी कायद्याच्या अज्ञान पणामुळे जात प्रमाणपत्र काढलेली आहेत तर अनेक जनाची जात प्रमाणपत्र पडताळणी होऊन होवून वैधता प्रमाणपत्र प्राप्त झालेली आहेत अशा परिस्थितीत इतर त्यांच्याच रक्तनातेवाईकाना महाराष्ट्र अनुसूचित जाती,भटक्या जमाती,इतर मागासवर्गीय व विशेष मागास प्रवर्ग जात प्रमाणपत्र देण्याचे अधिनियम २००० व नियम २०१२ कलम ५ (१) अन्वये अर्जदार स्वतः किवा त्यांच्याकडील किवा पणजोबा किवा नातेवाईक हे मानवी दिनाकास ज्या सक्षम प्राधिकाऱ्याच्या प्रादेशिक अधिकारितेच्या क्षेत्राच्या आत सर्वसाधारणताः राहत होते त्या सक्षम प्राधिकाऱ्याला अर्जदारास जातीचे प्रमाणपत्र देता येईल,तसेच नियम २०१२ कलम ५(२) अन्वये अर्जदार किवा त्यांचे वडील किंवा पणजोबा त्या सक्षम प्राधिकरणाच्या अधिकारितेच्या क्षेत्रातील कोणत्याही ठिकाणी सर्वसाधारण रहिवाशी नसतील तर,अशा क्षेत्रामधील नोकरी,रोजगार,शिक्षण किवा तुरूगातील बंदिवास इत्यादी कारणाने अशा क्षेत्रात अर्जदाराच्या तात्पुरत्या राहण्यामुळे त्या सक्षम प्राधिकार्यास जातीचे प्रमाणपत्र देण्याचे अधिकारिता प्रदान केले जाणार नाही यामुळे प्रमाणपत्र,वैधता प्रमाणपत्र मिळविण्यासाठी ही अट शिथिल केल्यास विद्यार्थी,पालकांची गैरसोय दूर करण्या बाबत उचित निर्णय घेवून कार्यवाही करण्याबाबत जिल्हास्तरीय जात पडताळणी समितीना निर्देश द्यावेत ही विनंती करण्यात आली आहे



PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE